# जाहिर सुचना

## खालील पदांच्या गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या उमेदवारांची मुळ कागदपत्र पडताळणी व समुपदेशन

## दि.07/12/२०२२ रोजी वेळ 10.30 वाजता

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध पदाच्या पदभरती करीता दि.१३/०७/२०२२ ते २२/०७/२०२२ पर्यंत अर्ज मागविण्यात आलेले होते. त्या अनुषंगाने खालील पदासाठी प्राप्त झालेल्या अर्जाच्या आधारे खालील पदांच्या गुणानुक्रमे पात्र उमेदवारांची यादी व अपात्र उमेदवारांची यादी, जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने खालील पदांच्या गुणानुक्रमे मुळ कागदपत्र पडताळणी व समुपदेशन करीता उमेदवारांची यादी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

1) **Physiotherapist**
2) **Psychologist**
3) **Optometrist**
4) **Dental Assistant**
5) **Facility Manager**
6) **Case Registray Assistant**

तरी याव्दारे उपरोक्त पदांच्या यादीतील उमेदवारांना सुचित करण्यात येते की, **दि.07/12/२०२२ रोजी स्थळः-** आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, लातूर. येथे खालील उमेदवारांनी त्यांच्या मुळ कागदपत्र व अनुभव प्रमाणपत्र सक्षम अधिकारी (जिल्हा आरोग्य अधिकारी/जिल्हा शल्य चिकित्सक/आरोग्य अधिकारी मनपा इत्यादी) यांच्या स्वाक्षरीचे कागदपत्र पडताळणीच्या वेळेस तपासणी करीता उपलब्ध करुन देण्यात यावे. अन्यथा आपण सादर केलेल्या अनुभव प्रमाणपत्राच्या छायाकिंत प्रतीच्या आधारे अनुभवासाठी देण्यात आलेले गुण गृहित धरण्यात येणार नाहीत व देण्यात आलेले गुण कमी करण्यात येतील याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सदर यादीतील उमेदवारांना गुणानुक्रमे प्रवर्गनिहाय १:३ (एकास तीन) या प्रमाणे कागदपत्र पडताळणीकरीता बोलविण्यात येत असून उमेदवाराच्या मुळ कागदपत्राच्या पडताळणी नंतर प्रवर्गनिहाय अंतिम गुणवत्ता यादी तयार करुन त्याच दिवशी रिक्त असलेल्या ठिकाणी गुणवत्तेनुसार समुपदेशनाव्दारे निवड करण्यात येईल.

**समुपदेशनाच्या दिनांक व वेळेत उमेदवारांने उपस्थित राहणे बंधनकारक आहे. तदनंतर उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

(डॉ.एल.एस देशमुख)
जिल्हा शल्य चिकित्सक
लातूर.



Scanned with CamScanner